# मुख्य वनसंरक्षक (संशोधन शिक्षण व प्रशिक्षण ) महाराष्ट्र राज्य, पुणे

## संशोधन शाखा

## संशोधन

तत्कालीन मुंबई प्रांताच्या वनविभागामध्ये वानिकी संशोधन शाखेची स्थापना १९३९ साली पुणे येथे झाली. प्रामुख्याने वनसंशोधनाच्या बाबी हाताळणे व वनविभागातील वानिकीच्या वाढत्या गरजा भागविणे हा जरी ह्या शाखेचा मुख्य उद्देश असला तरी सुरवातीस वनसंशोधन संस्था, डेहराडून या संस्थेच्या गरजा पूर्ण करणेच्या दृष्टीने मर्यादीत काम या शाखेकडून करण्यात येत होते. वानिकी संशोधनाचा पहिला त्रैवार्षिक वनसंशोधन कार्यक्रम १९४३-४४ मध्ये वनसंशोधन संस्था, डेहराडून या संस्थेच्या मान्यतेने घेण्यात आला. नंतर वनसंशोधन कार्यक्रमाचा कालावधी ५ वर्षाचा करणेत येऊन, वनसंशोधन संस्थेच्या समन्वयाने पहिला पंचवार्षिक वनसंशोधन कार्यक्रम १९५१-५२ मध्ये तयार करण्यात आला. वन विभागामध्ये सुरूवातीला वनसंशोधनाची शाखा ही कार्यआयोजना शाखेशी संलग्न होती. त्यानंतर वनसंशोधन शाखा वन शिक्षण वृत्ताशी जोडण्यात आली. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर राज्यातील वनसंशोधनाचा विशेष विचार करणेत येऊन राज्याच्या पूर्वेकडील भूप्रदेशातील वनविभागातील वनसंशोधनाचे दृष्टीने सहाय्यक वनसंवर्धन तज्ञ, नागपूर पदाची निर्मिती करून वनसंशोधन शाखेचे बळकटीकरण करण्यात आले. सन १९६८ मध्ये वनसंशोधन व वन शिक्षण या साठी स्वतंत्र वृत्तांची निर्मिती करण्यात आली. तसेच सहाय्यक अनुवंशशास्त्रज्ञ, वाडा हे पद सन १९६८ मध्ये निर्माण करणेत आले. त्यानंतर सन १९६९ मध्ये महाराष्ट्र वनसंशोधन संस्थेची चंद्रपूर येथे स्थापना करण्यात आली. सन १९८३ मध्ये वनसंरक्षक (वनसंशोधन व वनशिक्षण वृत्त) हे पद, अतिरीक्त मुख्य वनसंरक्षक दर्जाचे करण्यात आले. तसेच सन १९८५ मध्ये सहाय्यक वनसंरक्षक, (संशोधन) जालना हे पद निर्माण करण्यात आले. सन १९८८ मध्ये अतिरीक्त मुख्य वनसंरक्षक (संशोधन व शिक्षण) हे पद, परत वनसंरक्षक दर्जाचे करण्यात आले. आणि सन १९९० मध्ये वनसंशोधन व वनशिक्षण वृत्तामधून वनशिक्षण वृत्त वेगळे करण्यात आले. ऑक्टोबर २००२ मध्ये शासन आदेश क्र. आयएफएस-१००२/प्रक्र/१४८/फ-७ दि. ११ ऑक्टोबर २००२ अन्वये वनसंरक्षक, वनसंशोधन वृत्त या पदाची मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण ), महाराष्ट्र राज्य, पुणे अशी श्रेणीवाढ करण्यात आली व त्यास वनसंरक्षक, वन शिक्षण वृत्त जोडण्यात आले. मुख्य वनसंरक्षक (संशोधन शिक्षण व प्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे कार्यालयाकडून वनसंशोधनाच्या बाबी, वनसंरक्षक तथा वनसंवर्धन तज्ञ, पश्चिम प्रदेश पुणे व वनसंरक्षक तथा वनसंवर्धन तज्ञ पूर्व प्रदेश, चंद्रपूर यांचे मार्फत, व वन शिक्षण व प्रशिक्षण विषयक बाबी, वनसंरक्षक, वनशिक्षण वृत्त, म.रा. पुणे यांचे मार्फत हाताळण्यात येतात व प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर कार्यालयाशी समन्वय साधला जातो.

सन २००३ मध्ये वनसंशोधन वृत्ताची पूर्व प्रदेश व पश्चिम प्रदेश अश्या दोन संशोधन वृत्तात विभागणी करणेत आली. सन २००३ मध्ये वनसंशोधन वृत्ताची पुर्नरचना करून त्याचे विदर्भाकरीता पूर्व प्रदेश संशोधन वृत्त, मुख्यालय चंद्रपूर व उर्वरीत राज्याकरीता पश्चिम प्रदेश संशोधन वृत्त, मुख्यालय पुणे अशा दोन वृत्तात विभागणी करणेत आली. सदर संशोधन वृत्ताचे प्रमुख म्हणून वनसंरक्षक दर्जाचे अधिकारी नेमण्यात आले. वनसंशोधनाची क्षेत्रिय कामे ही संशोधन केंद्र व संशोधन उपकेंद्रातून केली जातात. संशोधन केंद्राचे व्यवस्थापन हे वनक्षेत्रपाल दर्जाचे अधिकारी व संशोधन उपकेंद्राचे व्यवस्थापन हे वनपाल दर्जाचे आधिकारी यांचे मार्फत केले जाते. राज्यामध्ये एकूण १४ संशोधन केंद्रे असून ४७ संशोधन उपकेंद्रे आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे

## B) Reserch Centres and Stations :

The list of Reserch Centres and Reserch Stations, in various agro climatic zones are given below.

| Research Centre (RFO Incharge) | Research Station (Forester Incharge) | District | Year of establishment | Soil Type | Comptt./ Survey No. | Agroclimatic Zone | Area (ha.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| **Conservator of Forests & Silviculturist, Pune** | | | | | | | |
| Pune | Hadapsar | Pune | 1960 | Black cotton mixed with lateratic murumi | S. No. 187/188 | Transition zone - II | 4.00 |
| | Research Garden | Pune | 1940 | Black cotton mixed with lateratic | S. No. 500 | Transition zone - II | 1.00 |
| | Parawadi | Pune | 2003 | Black cotton & Red murumi | 26 | Transition zone - II | 10.00 |
| | Lingmala | Satara | 1965 | Red lateratic murumi | 81 | Transition zone – II | 60.00 |
| | Gureghar | Satara | 1956 | Red lateratic murumi | 69 | Transition zone – II | 84.48 |
| | Bondarwadi | Satara | 1968 | Red lateratic murumi | 139 | Transition zone - II | 20.00 |
| Koynanagar | Koynanagar | Satara | 1965 | Black with gravels & murumi | 97, 100, 101, 102, 112 & 113 | Transition zone - I | 60.00 |
| | Shirshinge | Satara | 1967 | Black with gravels & murumi | 7, 34 & 40 | Transition zone - I | 20.00 |
| | Kisrule | Satara | 1967 | Black with gravels & murumi | 79 pt., 80 pt. & 90 pt. | Transition zone - I | 10.88 |
| | Chirambe | Satara | 1984 | Lateratic | 3 to 21 | Transition zone - I | 30.00 |
| | Nerle | | 2002 | Black with gravels & murumi | 428 | Transition zone - I | 20.00 |
| | Retre Dharan | Sangli | 2005 | Lateratic murumi brown to yellowish in colour | 124 | Transition zone - I | 17.00 |
| Doda marg | Padave Mazgaon | Sindhudurg | 1966 | Red lateratic | 8, 19 & 26 | Transition zone - I | 19.12 |
| | Tervan Medhe | Sindhudurg | 1980 | Red lateratic | 48 | Very high rainfall zone with lateritic soil | 93.27 |
| | Fondiye | Sindhudurg | 1983 | Red lateratic | 20 Pt. & 22 | Very high rainfall zone with lateritic soil | 84.93 |
| | Chafeli | Sindhudurg | 2004 | Lateratic | 17(2), 19 & 93/2 | Very high rainfall zone with lateritic soil | 2.50 |
| | Nirwade | Sindhudurg | 2004 | Lateratic | 91 | Very high rainfall zone with lateritic soil | 2.50 |
| Ajra | Parewadi | Kolhapur | 1980 | Lateratic murumi | 29, 39, 43 & 46 | Transition zone - I | 25.00 |
| | Sulgaon | Kolhapur | 1978 | Lateratic murumi with gravels | 74 to 76, 81 & 93 to 99 | Transition zone - I | 72.00 |
| | Dewarde | Kolhapur | 1981 | Lateratic murumi | 110, 116, 121, 128, 129 | Transition zone - I | 68.00 |
| | Kasar Kandgaon | Kolhapur | 1980 | Lateratic murumi | 81 & 82 | Transition zone - I | 30.00 |
| | Chandewadi | Kolhapur | 2002 | Lateratic murumi | 47 | Transition zone - I | 36.00 |
| | Bacchi | Kolhapur | 2004 | Lateratic murumi with gravels | 98 to 101 & 104 | Transition zone - I | 15.00 |
| | | | | | | **TOTAL** | **785.68** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **Assistant Geneticist, Wada** | | | | | | | |
| Wada | Wada | Thane | 1967 | Water logged Black cotton | 512 | Very high rainfall zone with non lateritic soil | 67.00 |
| Shahapur | Shahapur | Thane | 1942 | Well drained Black | 881 | Very high rainfall zone with non lateritic soil | 4.73 |
| | Palshin | Thane | 1967 | Reddish black murumi | 948 | Very high rainfall zone with non lateritic soil | 25.00 |
| | Murbad | Thane | 1997 | Murumi & bouldery | 773 | Very high rainfall zone with non lateritic soil | 25.00 |
| | Kalamba | Thane | 2002 | Water logged Black cotton | S. No. 95, 96 | Very high rainfall zone with non lateritic soil | 10.85 |
| Kamare | Kamare | Thane | 1979 | Water logged Black cotton | S. No. 371, 374, 435, 808, 80 | Very high rainfall zone with non lateritic soil | 199.49 |
| | Wangaon | Thane | 1962 | Well drained Reddish | S. No. 25, 92, 253 | Very high rainfall zone with non lateritic soil | 56.70 |
| | Bharad | Thane | 2001 | Well drained Black | 239 | Very high rainfall zone with non lateritic soil | 4.50 |
| | | | | | | **TOTAL** | **393.326** |
| **Asstt. Conservator of Forests (Research), Jalna** | | | | | | | |
| Jalna | Jalna | Jalna | 1984 | Black cotton | S. No. 204 | Assured rainfall zone | 50.00 |
| Parola | Eklagna | Jalgaon | 1984 | Black cotton | Kuran 36 | Assured rainfall zone | 36.00 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Kadaji | Jalgaon | 1984 | Black cotton | 55 | Scarcity zone | 20.00 |
| | Mondhale | Jalgaon | 1984 | Black cotton | 349 | Scarcity zone | 38.00 |
| Nawapur | Nawapur | Nandurbar | 1984 | Red loam | S. No. 285 | Transition zone - II | 4.00 |
| | Ukalapani | Nandurbar | 1984 | Red loam | Coupe No. 63/B | Transition zone - II | 5.00 |
| | Karanji | Nandurbar | 1984 | Red loam | Coupe No. 7 & 10 | Transition zone - II | 28.00 |
| | | | | | | **TOTAL** | **181.00** |
| | | | | | | **TOTAL AREA (Western Region)** | **1360.001** |
| **Conservator of Forests & Silviculturist, Chandrapur** | | | | | | | |
| Lohara | Lohara | Chandrapur | 1969 | Granite gneiss | 397, 398, 403, 407, 409 | High Rainfall zone with soils from rocks of mixed origin | 268.00 |
| | Indrasen Bardi | Chandrapur | 1995 | Granite gneiss | 406 | High Rainfall zone with soils from rocks of mixed origin | 42.00 |
| Tadgaon | Tadgaon | Chandrapur | 1982 | Archaean gneiss | 194 | High Rainfall zone with soils from rocks of mixed origin | 8.00 |
| Tadgaon | Kothi | Chandrapur | 1983 | Archaean gneiss | 104 | High Rainfall zone with soils from rocks of mixed origin | 39.00 |
| | Botanpundi | Chandrapur | 1988 | Archaean gneiss | 180 | High Rainfall zone with soils from rocks of mixed origin | 10.00 |
| | | | | | | **TOTAL** | **367.00** |
| **Assistant Silviculturist, Nagpur** | | | | | | | |
| Paratwada | Nagpur | Nagpur | 1960 | Black loamy | 13 | Moderate to moderately high rainfall zone | 0.58 |
| | Chandani, Danapur | Wardha | 1965 | Red sandy loam with hard strata | 160 | Moderate to moderately high rainfall zone | 15.71 |
| | Wardha Nursery | Wardha | 1965 | Loamy mixed with sand | | Moderate to moderately high rainfall zone | 1.38 |
| Sakoli | Mohagatta | Bhandara | 1970 | Red sandy loam | 188 | High Rainfall zone with soils from rocks of mixed origin | 446.10 |
| | | | | | **TOTAL** | | **463.77** |
| | | | | | **TOTAL AREA (Eastern Region)** | | **830.77** |
| | | | | | | | **GRAND TOTAL : 2190.77** |

## MAJOR ACHIEVEMENTS

**1) Germ Plasm Bank -** A National level Germ Plasm Bank of Teak was established during 1979 at Lohara in Chandrpur in which 259 clones of teak collected from different states were planted. The germ plasm collection at Lohara is over 5.09 ha. which is the largest of its kind in the country. Another Germ Plasm Banks of Teak has also been established at Mohoghata & at Wada Research Centers. Small Germ Plasm Bank for Gmelina arborea , Dalbergia sissoo and Pterocarpus marsupium, Diospyros melanoxylon are also established

**2) Seed Orchards -** First clonal Teak Seed orchard of Maharashtra was established in 1969 at Lohara in Chandrpur. Till today Teak Seed Orchads have been established over 549 ha. located at varius parts of the state.

**3) Progeny Trials** - Progeny trials of teak have been laid over 36.60 ha. Progeny trial of species like Acacia catechu, Dalbergia sissoo, Bombax ceiba, Gmelina arborea, Prerocarpus marsupium, Sterculia urens, Syzingium cumini, Terminalia bellerica, Terminalia chebula etc. have also been laid over 25 ha.

**4) Plus trees -** Twenty ‘Plus Trees’ of Teak, Eight plus trees of Dalbergia latifolia and One of Bombax ceiba have been identified. In addition 427 candidate Plus Trees of identified

species i.e. Teak, Terminalia tomentosa ,Xylia xylocarpa, Acacia catechu ,Dalbergia latifolia, Terminalia chebula have also been identified.

**5) Bud Multiplication Garden -** A central Bud multiplication Garden of Teak has been established over 15.19 ha. at Lohara in Chandrapur to fulfill the objective of supply of buds for establishment of Teak seed orchards. Similar but smaller BMGS of Teak have also been established in other parts of the state, In addition, BMGS of Gmelina arborea, Dalbergia sissoo and Eucalyptus species have established over 2.30 ha.

**6) Intorduction trials of new species** Intorduction trials of the species i.e.varieties of Eucalyptus , Cupresses ,Pines, Khaya, Pterocarpus, Mesua species has been taken at various research stations in the state.

**7)** Vegetative Propagation techniques for endangered species like Nothapodytes nimmoniana (Narkia) and Saraca asoca (Sita ashok) have been standardized .

# प्रशिक्षण

## वन शिक्षण वृत्त, महाराष्ट्र राज्य, पुणे

वनसंरक्षक, वन शिक्षण वृत्त, महाराष्ट्र राज्य, पुणे हे या शिक्षण वृत्ताचे प्रशासकीय मुख्य अधिकारी आहेत.

२. वन विभागातील विभिन्न प्रशिक्षण कार्यक्रमाव्यतिरिक्त बाहेरील संस्थेकडूनही निरनिराळया विषयांवरती अल्प मुदतीच्या प्रशिक्षणासाठी समन्वय ठेवण्याची कार्यवाही तसेच निरनिराळया विषयांवरील मुख्य वनसंरक्षकांपासून ते वनरक्षक या सर्व तांत्रिक संवर्गातील प्रशिक्षण कार्यक्रमांची अंमलबजावणी वन शिक्षण वृत्तामार्फत केली जाते.

३. वन विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना दीर्घ / अल्प मुदतीचे प्रशिक्षण देण्याकरिता महाराष्ट्र राज्यात चंद्रपूर, चिखलदरा (जिल्हा अमरावती), शहापूर (जिल्हा ठाणे),पाल (जिल्हा जळगाव) व जालना येथे वन प्रशिक्षण केंद्रे उभारण्यात आली आहेत.

**१) वन शिक्षण वृत्ताची प्रशासकीय संरचना:**

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर

↓

मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

↓

वनसंरक्षक, वन शिक्षण वृत्त, महाराष्ट्र राज्य, पुणे

↓

- प्रधानाचार्य, मध्यवर्ती वनराजिक महाविद्याय, चंद्रपूर
- प्राचार्य, महाराष्ट्र वनक्षेत्रपाल प्रशिक्षण महाविद्यालय, चिखलदरा, जिल्हा अमरावती
- संचालक, दादासाहेब चौधरी वन प्रशिक्षण विद्यालय, पाल, जिल्हा जळगाव
- संचालक, वनरक्षक प्रशिक्षण विद्यालय, जालना
- संचालक, वनरक्षक प्रशिक्षण विद्यालय, शहापूर जिल्हा ठाणे

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव | एसटीडी कोड | फोन/फॅक्स नंबर | इ-मेल पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य वनसंरक्षक (संशोधन ,शिक्षण व प्रशिक्षण ) म.रा. पुणे | ०२० | २४४९५२७० | ccfrtpun@ sancharnet.in |
| २ | वनसंरक्षक, वन शिक्षण वृत्त, म.रा. पुणे | ०२० | २४४७४७९३ २४४७६०८७ | cfedupune @ gmail.com |
| ३ | प्रधानाचार्य, मध्यवर्ती वनराजिक महाविद्यालय, चंद्रपूर | ०७१७२ | २५५५१९ | cfrc_cha@ sancharnet.in |
| ४ | प्राचार्य, महाराष्ट्र वनक्षेत्रपाल प्रशिक्षण महाविद्यालय, चिखलदरा | ०७२२० | २३०२३० | ati_forestco@ sancharnet.in |
| ५ | संचालक, वनरक्षक प्रशिक्षण विद्यालय, शहापूर | ०२५२७ | २७२०८६ | fgts_shp@ vsnl.com |
| ६ | संचालक, वनरक्षक प्रशिक्षण विद्यालय, जालना | ०२४८४ | २३१५२७ | fgtsjalana_jln@ sancharnet.in |
| ७ | संचालक, दादासाहेब चौधरी वन प्रशिक्षण विद्यालय, पाल | ०२५८४ | २८८४१२ | --- |

महाराष्ट्र वन विभागातील कर्मचा-यांना शास्त्रोक्त व आधुनिक वन शास्त्राचे नियमित प्रशिक्षण देण्याकरिता महाराष्ट्रात खालील वन प्रशिक्षण विद्यालय/ महाविद्यालय स्थापण्यात आली आहेत.

**अ) वनरक्षक प्रशिक्षण विद्यालय, जालना, जिल्हा जालना**

सदरचे प्रशिक्षण विद्यालय सन **१९८५** मध्ये स्थापित करण्यात आले असून, सदर विद्यालयात **६०** वनरक्षक प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याची क्षमता आहे. सदरचे प्रशिक्षण विद्यालय जालना रेल्वे स्थानकापासून ६ कि.मी. अंतरावर व जालना बस स्थानकापासून ४ कि.मी. अंतरावर आहे. सध्या येथे वनरक्षकांचे सेवांतर्गत एक वर्षाचे प्रशिक्षण सुरू आहे. संचालक (विभागीय वन अधिकारी दर्जाचे) हे प्रशिक्षण विद्यालयाचे प्रमुख आहेत.

ब) **वनरक्षक प्रशिक्षण विद्यालय, शहापूर, जिल्हा ठाणे.**

सदरचे वनरक्षक प्रशिक्षण विद्यालय सन **१९६३** मध्ये स्थापित करण्यात आले असून, त्या विद्यालयात **१००** वनरक्षक प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याची क्षमता आहे. सदरचे प्रशिक्षण विद्यालय शहापूर बस स्थानकापासून २ कि.मी. अंतरावर व अस्तगाव रेल्वे स्थानकापासून २ कि.मी. अंतरावर व अस्तगाव रेल्वे स्थानकापासून २ कि.मी. तर कसारा रेल्वे स्थानकापासून २० कि.मी. अंतरावर आहे. सध्या येथे वनरक्षकांचे सेवांतर्गत एक वर्षाचे प्रशिक्षण सुरू आहे. संचालक (विभागीय वन अधिकारी दर्जाचे) हे प्रशिक्षण विद्यालयाचे प्रमुख आहेत.

क) **दादासाहेब चौधरी वन विद्यालय, पाल, जिल्हा जळगाव**

सदरचे वनरक्षक प्रशिक्षण विद्यालय सन १९६८ मध्ये स्थापित करण्यात आले असून, तेथे १०० वनरक्षक प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याची क्षमता आहे. सदरचे प्रशिक्षण विद्यालय बस स्थानकापासून २०० मीटर अंतरावर व भुसावळ रेल्वे स्थानकापासून ७० कि.मी. व रावेर रेल्वे स्थानकापासून ३७ कि.मी. अंतरावर आहे. सध्या येथे वनरक्षकांचे सेवांतर्गत एक वर्षाचे प्रशिक्षण सुरू आहेत. संचालक (विभागीय वन अधिकारी दर्जाचे) हे प्रशिक्षण विद्यालयाचे प्रमुख आहेत.

ड) **महाराष्ट्र वनक्षेत्रपाल प्रशिक्षण महाविद्यालय, चिखलदरा**

सदरचे प्रशिक्षण महाविद्यालय सन **१९७४** मध्ये स्थापित करण्यात आले. सदर महाविद्यालयात **६०** प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याची क्षमता आहे. सदरचे प्रशिक्षण महाविद्यालय चिखलदरा बस स्थानका पासून ३ कि.मी. व बडनेरा रेल्वे स्टेशन पासून ९० कि.मी. अंतरावर आहे. सध्या येथे वन्यजीव विभाग व सामाजिक वनीकरण विभागाकडील अल्प मुदतीचे प्रशिक्षण सुरू आहेत. प्राचार्य (विभागीय वन अधिकारी दर्जाचे) हे प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्रमुख आहेत.

ई) **मध्यवर्ती वनराजिक महाविद्यालय, चंद्रपूर**

चंद्रपूर येथे सन १९६० मध्ये वनपालांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण विद्यालय स्थापित करण्यात आले. त्यानंतर सन **१९७६** मध्ये त्याच ठिकाणी मध्यवर्ती वनराजिक

महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली आहे. सदर महाविद्यालयात १०० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याची क्षमता आहे. सदरचे प्रशिक्षण महाविद्यालय चंद्रपूर बस स्थानकापासून व चंद्रपूर रेल्वे स्टेशन पासून ४ कि.मी. अंतरावर आहे.  सध्या येथे वनपालाचे एक वर्षाचे अभिक्रम प्रशिक्षण सुरू आहे. प्रधानाचार्य (विभागीय वन अधिकारी दर्जाचे) हे प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्रमुख आहेत.

वरील पाचही विद्यालय/महाविद्यालयामध्ये खालील प्रमाणे सोयी सवलती उपलब्ध आहेत.

१) प्रशिक्षणार्थीकरीता उत्तम राहण्याची व्यवस्था.

२) प्रशिक्षणाकरीता उत्कृष्ट वर्ग खोल्या, सभागृह, द्क-श्राव्य साधने उपलब्ध आहेत.

३) प्रशिक्षणासाठी प्रत्येकी २० संगणक असलेले संगणक कक्ष

४) प्रशिक्षणार्थीकरीता उत्तम खेळाचे मैदान व खेळाचे साहित्य उपलब्ण्ध आहेत.

५) अनुभवी व प्रशिक्षीत शिक्षक वर्ग उपलब्ध.

६) अध्यायावत ग्रंथालय

७) वाहतुकीकरीता मिनी बस, टाटा सुमो वाहने उपलब्ध आहेत.

८) प्रशिक्षणार्थींच्या मनोरंजनाकरीता दुरदर्शन, कॅरम, बॅडमिंटन हॉल, जिमन्याशियम हॉल इत्यादी साधन उपलब्ध.

९) प्रशिक्षणार्थींच्या जेवणासाठी मेस उपलब्ध आहे.

वरील पाचही विद्यालय/महाविद्यालयामध्ये प्रशिक्षणार्थींना शैक्षणिक अभ्यास दौरा कार्यक्रम आयोजित केला जातो. तसेच प्रशिक्षणार्थींना क्षेत्रीय विभागामध्ये कार्यानुभव प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. प्रशिक्षणामध्ये खालील विषय प्रामुख्याने शिकविले जातात.

प्रशिक्षण विद्यालय/महाविद्यालयामध्ये देण्यात येणा-या दिर्घ मुदतीच्या प्रशिक्षणामध्ये खालील विषयांप्रमाणे पुस्ताकांचा समावेश आहे.

**वनरक्षकांचे प्रशिक्षणामध्ये पहिल्या सत्रात १० विषय व दुस-या सत्रामध्ये ८ विषयांचे प्रशिक्षण देण्यात येते. विषय खालील प्रमाणे**

१. मृद व जलसंधारण, पणलोट क्षेत्र व्यवस्थापन

२. वनसंवर्धन भाग-१

३. वनसंवर्धन भाग-२

४. वननिती व उपयुक्त प्रजातींच्या व्यवस्थापनाबाबत माहिती

५. वनसंरक्षणाची मुलभूत तत्वे

६. वनसंरक्षण, वन कायदा व इतर शासकीय आदेश व नियम

७. वन्यजीव व्यवस्थापन, वन्यजीव संरक्षण अधिनियम बायो डाव्हरसिटी व इको टुरिझम

८. वनस्पती शास्त्र व अकाष्ठ वनोत्पादन

९. लेखा व कार्यप्रणाली आणि कामगार कायदे

१०. वनमिती व मुलभूत संख्या शास्त्र

११. प्रकाष्ठ निष्कासन

१२. वनावर आधारित उद्योग आणि मुलभूत वनसंख्या शास्त्र

१३. वन सर्वेक्षण व ड्राईंग

१४. वन अभियांत्रिकी

१५. वन विभागाची संरचना व वनविभागातील व इतर विभागातील योजना विषयी माहिती

१६. ग्रामीण समाजशास्त्र व वन विस्तार

१७. मानव व्यवस्थापन व आदिवासी संशोधन व प्रशिक्षण

१८. संयुक्त वन व्यवस्थापन व वन विकास यंत्रणा

**<u>तसेच वनपालांकरीता प्रशिक्षणामध्ये खालील विषयांचा समावेश आहे.</u>**

१. मृद व जलसंधारण

२. वनसंवर्धन व वनसंवर्धन पध्दती

३. वनसंरक्षण, कवक व किटकशास्त्र

४. वन्यजीव व्यवस्थापन व वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२

५. वनस्पतीशास्त्र व अकाष्ठ वनउपज

६. वनमिती व प्राथमिक सांख्यिकी

७. वनसर्व्हेक्षण व आरेखन

८. ग्रामीण समाजशास्त्र, वनप्रसार व प्रचार

९. मानव संसाधन व्यवस्थापन आणि ट्रायबल इंटफेस

१०. वन अभियांत्रिकी

११. लेखा व कार्यप्रणाली आणि मजुर कायदे

१२. वनउपयोगिता, प्रकाष्ठ निष्कासन आणि वनावर आधारीत उद्योगामध्ये वापरल्या जाणा-या यंत्रांची निगा.

१३. वनसंरक्षण, वनविधी आणि महत्वाचे इतर प्रजातिंची माहिती.

१४. वननिती व वनव्यवस्थापन आणि उपयुक्त वन प्रजातींची माहिती.

१५. संयुक्त वनव्यवस्थापन आणि वनविकास यंत्रणा.

**<u>अल्प मुदतीच्या प्रशिक्षण कार्यक्रमात खालील विषयांचा समावेश आहे.</u>**

१. वन्यजीव व्यवस्थापन व निसर्ग संवर्धन
२. वन विकास यंत्रणा व संयुक्त वन व्यवस्थापन
३. वन्यजीव कायदे
४. वनसंरक्षण व वनकायदे
५. निसर्ग मार्गदर्शक
६. वनवणवा प्रतिबंधक उपाय योजना
७. जैव विविधता संरक्षण व संवर्धन
८. व्यक्तीमत्व विकास
९. योग व साधना
१०. औषधी वनस्पती अभ्यास
११. सुगंधी वनस्पती अभ्यास
१२. गांडूळ खत
१३. सेन्द्रीय खत
१४. रोपवाटीका तंत्रज्ञान
१५. वनस्तींचे नमुने गोळा करण्याच्या पध्दती
१६. प्राथमिक संगणक हाताळणी
१७. वनसंवर्धनाच्या पध्दती
१८. वनव्यवस्थापन
१९. प्रकाष्ठ निष्कासन व लिलाव पध्दतींचा अभ्यास
२०. कुपाचे काम
२१. कार्यआयोजना
२२. वननिती
२३. वनमिती
२४. वनसंवर्धन कायदा
२५. जैव विविधता कायदा
२६. पर्यावरण संरक्षण कायदा
२७. वनउपयोगिता
२८. वनसर्व्हेक्षण
२९. वनखात्या संबंधीची माहिती
३०. महाराष्ट्र नागरी सेवेचे नियम
३१. सामाजिक वनीकरण
३२. कामगार कायदे
३४. प्रदुषण नियंत्रण
३५. वनस्पतीशास्त्र (क्षेत्रिय ओळख )